॥ श्री ॥

१० नाटकदीप:

-आरंभिलेला ग्रंथ निर्विघ्नपणें समाप्त व्हावा म्हणून इष्ट देवता तत्त्वानुस्मरणरूप मंगलाचरण करून मंदाधिकाऱ्यांना निष्प्रपंच ब्रह्मात्मत्वाचें ज्ञान अनासायानें व्हावें यासाठीं 'अध्यारोप व अपवाद यांच्या योगानें निष्प्रपंच वस्तूचें प्रतिपादन केलें जातें' या न्यायाला अनुसरून प्रथम आत्म्यावरील अध्यारोप सांगतात -

परमात्माऽद्वयानन्दपूर्ण: पूर्वं स्वमायया ।
स्वयमेव जगद्भूत्वा प्राविशज्जीवरूपत: ॥१

अन्वयार्थ - [पूर्वं अद्वयानन्दपूर्ण: परमात्मा-] सृष्टीच्या पूर्वीं अद्वितीय आनंदघन परमात्मा [स्वमायया स्वयं एव जगत् भूत्वा-] आपल्या मायेच्या योगानें स्वत:च जगत् होऊन [जीवरूपत: प्राविशत्-] जीवरूपानें त्यांत प्रवेश करिता झाला.

प्रकाश:- सृष्टीच्या पूर्वीं केवल सत् होतें. सत् म्हणजे शबल ब्रह्म असें श्रीमच्छंकराचार्यांनीं मांडूक्योपनिषदावरील भाष्यांत म्हटलें आहे. पुढें सर्व प्राण्यांचीं कर्में जेव्हां फलोन्मुख झालीं तेव्हां त्या सद्रूप ईश्वरानें सृष्टीरूप होण्याचा संकल्प केला. व अचिन्त्य शक्तिरूप मायेच्या आश्रयानें तोच स्वत: सृष्टि झाला. पण ती माया जड असल्यामुळें ही सर्व सृष्टिहि जड झाली. व त्यामुळें कर्मफलांचा भोग घडणें कठिण झालें. तेव्हां त्या ईश्वरानें स्वत: जीवरूपानें त्या सर्व जडसमूहांत प्रवेश केला. या जीवरूपास भगवद्गीतेंत पर प्रकृति म्हणून म्हटलें आहे. प्रस्तुत प्रतिपादनास अनेक श्रुतींचेंहि प्रमाण आहे. श्रुत्यादि प्रमाणग्रंथामध्यें ईश्वराच्या शुद्ध स्वरूपावर सृष्टीचीं जी ही अशा कल्पना केलेली असते तिलाच अध्यारोप म्हणतात. या श्लोकांत प्रथमत: परमात्मा हा शब्द योजून ग्रंथकारांनीं मंगलाचरण केलें आहे. ॥१॥

-'अहोपण, एक परमात्माच जर सर्व शरीरांमध्यें प्रविष्ट झाला आहे, तर एक पूज्य व दुसरा पूजक अशा प्रकारें प्रत्ययास येणाऱ्या उत्तमाधमभावाची काय वाट ?' उत्तर -

विष्ण्वाद्युत्तमदेहेषु प्रविष्टो देवता भवेत् ।
मर्त्याद्यधमदेहेषु स्थितो भजति मर्त्यताम् ॥२

अन्वयार्थ - [विष्ण्वादि-उत्तमदेहेषु प्रविष्ट: देवता भवेत्-] विष्णु-इत्यादि उत्तम शरीरांमध्यें प्रविष्ट झालेला परमात्मा देवता होतो. [तथा मर्त्यादिअधमदेहेषु स्थित: मर्त्यतां भजति-] व मनुष्यादि अधमदेहांमध्यें असलेला परमात्मा मर्त्य होतो.

प्रकाश:- विष्णु, शिव, ब्रह्मा, इंद्र, वरुण, इत्यादि सशरीरी असल्यामुळें त्यांच्या शरीरांत प्रविष्ट झालेल्या आत्म्यास देवत्व येतें, व त्यामुळें तो इतरांस पूज्य होतो. व मनुष्य, पशु, पक्षी, सर्प, इत्यादिक आकारांत प्रविष्ट झालेल्यास पूजकत्व येतें. अर्थात् पूज्यपूजकभाव आकारास किंवा उपाधीस अनुलक्षून आहे. आत्म्याचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं. ॥२॥

-ह्याप्रमाणें आत्म्यावर सृष्टीचा आरोप कसा होतो तें संक्षेपत: सांगून आतां त्याचा अपवाद साधनांसह थोडक्यांत दाखवितात -

अनेकजन्मभजनात्स्वविचारं चिकीर्षति ।
विचारेण विनष्टायां मायायां शिष्यते स्वयम् ॥३

अन्वयार्थ - [अनेकजन्मभजनात् स्वविचारं चिकीर्षति-] अनेक जन्मांमध्यें केलेल्या कर्मार्पणरूप

भजनामुळें प्राणी आत्मविचार करण्याची इच्छा करितो [विचारेण मायायां विनष्टायां स्वयं शिष्यते-] आणि विचाराच्या योगानें माया नष्ट झाली असतां स्वत: आत्माच अवशिष्ट राहतो.

प्रकाश:- अनेक जन्मांमध्यें ईश्वरार्पण बुद्धीनें केलेलें कर्मच भजन होय. अशा प्रकारच्या भजनामुळें साधकाची चित्तशुद्धि होते. चित्तशुद्धीनंतर आत्म्या-विषयीं विचार करावा अशी इच्छा होते. इच्छेचा परिणाम प्रवृत्तीमध्यें होत असल्यामुळें विचारानंतर माया नष्ट होते. माया हा एक मोठा बलवान् रोग असल्यामुळें त्याच्या नाशार्थ विचारहि तितक्या योग्यतेचाच करावयास पाहिजे हें उघड आहे. मायेचा नाश झाला असतां शेवटीं एक आत्माच अवशिष्ट राहतो. सारांश, सर्व द्वैतप्रपंचाच निषेध हाच अपवाद होय. विचार हें त्याचें साधन आहे. अपवादानंतर एकट्या आत्म्यानें राहणें म्हणजे ही मुक्तिस्थितिच होय, यांत कांहीं शंका नाहीं. ॥३॥

-"अहोपण, 'तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा सर्वबंधै: प्रमुच्यते' इत्यादि श्रुतींनीं बंधनिवृत्तिरूप मोक्षाला ज्ञानफलत्व सांगितलें असल्यामुळें 'परमात्म्यानें अवशिष्ट राहणें हें ज्ञानाचें फल आहे,' असें सांगणें अयोग्य आहे," अशी शंका घेऊन म्हणतात -

अद्वयानंदरूपस्य सद्वयत्वं च दु:खिता ।
बंध: प्रोक्त: स्वरूपेण स्थितिर्मुक्तिरितीर्यते ॥४

अन्वयार्थ - [अद्वयानन्दरूपस्य सद्वयत्वं च दु:खिता बंध: प्रोक्त:-] अद्वय व आनंदरूप आत्म्याचें सद्वयत्व व दु:खित्व हाच बंध सांगितलेला आहे. [तथा स्वरूपेण स्थिति: मुक्ति: इति ईर्यते-] तसेंच, त्याची स्वरूपानें स्थिति होणें हीच मुक्ति असें सांगितलें आहे.

प्रकाश:- वस्तुत: आत्मा अद्वय म्हणजे सर्वभेद-शून्य व आनन्दरूप आहे. पण असें असतांनाहि तो प्रतिशरीरीं भिन्न व मायाकार्यामुळें भेदयुक्त असल्यासारखा दिसतो व तो दु:खितहि झाला आहे असें अनुभवास येतें; पण हाच बंध आहे. व त्या आत्म्यानें निरुपाधिक अवस्थेंत असणें हीच मुक्ति होय. ॥४॥

-'पण, 'जनकादि राजे कर्माच्या योगानेंच सिद्ध झाले' असें भगवानांनीं सांगितलें आहे. त्यावरून कर्म मोक्षाचें साधन आहे, असें सिद्ध होतें. मग हें विचारजन्य ज्ञान काय करावयाचें आहे ?' उत्तर --

अविचारकृतो बंधो विचारेण निवर्तते ।
तस्माज्जीवपरात्मानौ सर्वदैव विचारयेत् ॥५

अन्वयार्थ - [अविचारकृत: बंध: विचारेण निवर्तते-] अविचारामुळें होणारा बंध विचाराच्या योगानें निवृत्त होतो. [तस्मात् जीवपरात्मानौ सर्वदा एव विचारयेत्-] यास्तव जीव व परमात्मा त्यांच्याविषयीं सर्वदाच विचार करावा.

प्रकाश:- आत्म्यास जो बंध होत असतो तो अविवेकामुळेंच होत असतो. अर्थात् विचारावांचून त्याची निवृत्ति होणें शक्य नाहीं. यास्तव बंध निवृत्त व्हावा असें ज्याला वाटत असेल, त्यानें जीव व परमात्मा यांचा कसा संबंध झाला आहे याविषयीं विचार करणें उचित होय. आतां भगवानांनीं 'जनकादिक सिद्ध झाले' असें जें म्हटलें आहे, त्यांतील 'सिद्ध' या शब्दाचा मुक्त असा अर्थ न करितां चित्तशुद्धियुक्त असा करावा. म्हणजे त्या वचनाचा सिद्धान्ताशीं विरोध येणार नाही. ॥५॥

-अगोदर त्यांतील जीवाचें स्वरूप सांगतात -

अहमित्यभिमन्ता य: कर्ताऽसौ तस्य साधनम्।
मनस्तस्य क्रिये अंतर्बहिर्वृत्ती क्रमोत्थिते ॥६

अन्वयार्थ - [य: अहं इति अभिमंता असौ कर्ता-] जो 'मी' असा अभिमान बाळगणारा तो कर्ता

होय. [तस्य साधनं मनः-] त्याचें साधन मन आहे; [क्रमोत्थिते अंतर्बहिर्वृत्ती तस्य क्रिये-] क्रमानें उत्पन्न होणाऱ्या अंतर्बहिर्वृत्ती ह्याच त्याच्या क्रिया आहेत.

प्रकाशः- देहादिकांस उद्देशून 'मी' असें जो म्हणतो तोच कर्ता होय. "अत्राहं प्रत्ययी कर्तेत्येवं लोकव्यवस्थितिः ।" म्ह० यांतील अहं असा प्रत्यय करणारा कर्ता होय. इत्यादि प्रकारें पूर्वींहि (प्र. २ श्लोक १६) श्रीविद्यारण्यांनीं सांगितलें आहे. हा अभिमानी कर्तृत्वादि धर्मविशिष्ट असल्यामुळें जीव होय. कर्ता साधनांवांचून कोणतीच क्रिया करूं शकत नाहीं म्हणून मन हें त्याचें क्रियासाधन आहे. म्हणजे मनाच्या द्वारा जीव सर्व क्रिया करितो. मन हा अंतःकरणाचा भाग आहे हे निराळें सांगावयास नकोच. पण मनाच्या क्रिया कोणत्या ? असें कोणी विचारील म्हणून ग्रंथकार म्हणतात - क्रमाक्रमानें उत्पन्न होणाऱ्या अंतर्बहिर्वृत्ती ह्याच मनाच्या क्रिया होत. त्या एकाच कालीं उत्पन्न होत नसतात. तर एका वृत्तीचा निरोध करून दुसरी उत्पन्न होत असते. ॥६॥

-आतां त्या दोन वृत्तींचें स्वरूप व विषय सांगतात-

अंतर्मुखाऽहमित्येषा वृत्तिः कर्तारमुल्लिखेत् ।
बहिर्मुखेदमित्येषा बाह्यं वस्त्विदमुल्लिखेत् ॥७

अन्वयार्थ - [अहं इति एषा अंतर्मुखा वृत्तिः कर्तारं उल्लिखेत्-] 'मी' अशी ही अंतर्मुख वृत्ति कर्त्याला विषय करिते. [तथा इदं इति एषा बहिर्मुखा वृत्तिः इदं बाह्यं वस्तु उल्लिखेत्-] तसेंच 'हें' अशी ही बहिर्मुख वृत्ति या बाह्य वस्तूंना-देहाच्या बाहेरील पदार्थांना विषय करिते.

प्रकाशः- मनाची 'मी' ही अंतर्मुख वृत्ति व 'हें' ही बहिर्मुख वृत्ति होय. अंतर्मुखवृत्तीचा विषय बुद्धींतील चिदाभास व बहिर्मुख वृत्तीचा बुद्धि इत्यादि सर्व जड वर्ग होय. श्रीमद्भाष्यकारांनीं या उभयविध विषयांसच शारीरक भाष्याच्या आरंभीं 'अस्मत्प्रत्ययगोचर व युष्मत्प्रत्ययगोचर' असें म्हटलें आहे. पण स्थूल दृष्ट्या देहांतील विषयांस अंतर् व देहाच्या बाहेरील विषयांस बहिर् विषय असें म्हणण्याचा प्रघात आहे. व तो कांहीं अंशीं बरोबर आहे. कारण व्यावाहारिक अवस्थेंत चिदाभास कर्ता, बुद्धि, मन, इंद्रियें इत्यादि साधनें (करण); व देहाच्या बाहेरी पदार्थ कार्य असें म्हणत असतात. ॥७॥

-अहोपण, मनानेंच जर सर्व व्यवहार सिद्ध होऊं लागला तर चक्षुरादि इंद्रियें व्यर्थ ठरतात !' अशी आशंका घेऊन उत्तर -

इदमो ये विशेषाः स्युर्गन्धरूपरसादयः ।
असांकर्येण तान्भिन्द्याद् घ्राणादींद्रियपंचकम् ॥८

अन्वयार्थ - [इदमः ये गंधरूपरसादयः विशेषाः स्युः-] 'हें' बहिर्वृत्तीच्या विषयांचे जे गंध, रूप, रस इत्यादि भेद आहेत. [तान् घ्राणादींद्रियपंचकं असांकर्येण भिंद्यात्-] त्यांस घ्राणादि पांच इंद्रियें अगदीं भिन्न भिन्न करितात.

प्रकाशः- 'हें' या शब्दाचा अर्थ - 'मी' या एका वृत्तीहून इतर सर्व कार्यजात- असा आहे. पण-प्रस्तुत प्रसंगीं देहाच्या बाहेरील विषयवर्ग-असाच त्याचा अर्थ करावा. या सर्व विषयवर्गाचें सामान्यतः ग्रहण मन करितें; पण त्याचें 'हा गंध आहे, हें रूप आहे,' अशा प्रकारें जीवास विशेष ज्ञान करून देण्यास त्यास इतर साधनांचीहि जरूर असते. अर्थात् श्रोत्र, त्वक्, नेत्र इत्यादि इंद्रियें व्यर्थ नसून विषयांचें पृथक् पृथक् ज्ञान करून देण्यास त्यांची फार आवश्यकता आहे. सारांश 'अहं' असा अभिमान करणारा जीव मन व इंद्रियें यांच्या द्वारा सर्व व्यावहारिक किया करितो. ॥८॥

-ह्याप्रमाणें गेल्या तीन श्लोकांत जीवाचें व त्याच्या साधनांचें निरूपण करून, आतां

परमात्म्याचेंस्वरूप सांगतात -

कर्तारं च क्रियां तद्वव्याावृत्तविषयानपि ।
स्फोरयेदेकयत्नेन योऽसौ साक्ष्यत्र चिद्वपु: ।।९

अन्वयार्थ - [कर्तारं च क्रियां तद्वत् व्यावृत्तविषयान् अपि-] कर्ता व क्रिया आणि त्याचप्रमाणें भिन्न भिन्न विषयहि यांस [य: चिद्वपु: एकयत्नेन स्फोरयेत् असौ अत्र साक्षी-] जो चिद्रूप आत्मा एकाच वेळीं प्रकाशित करितो, तो या वेदान्तशास्त्रांत साक्षी म्हटला आहे.

प्रकाश:- जीव, मनाच्या दोन प्रकारच्या वृत्ति व गंध, रस, रूप इत्यादि परस्पर भिन्न असलेले विषय यांस जो एकाच कालीं प्रकाशित करितो, तो चैतन्यरूप आत्माच वेदान्तशास्त्रांतील साक्षी होय; असा याचा भावार्थ समजावा. एकप्रयत्नेन या शब्दाचा उपयोग करून ग्रंथकारांनीं-हा चिद्रूप आत्मा आपली सर्व क्रिया एकदम करितो. मनाप्रमाणें यास त्या क्रमाक्रमानें कराव्या लागत नाहींत; असें सुचविलें आहे. ।।९।।

-साक्षी कर्ता, क्रिया व विषय या सर्वांस एकाच कालीं कसा प्रकाशित करितो तें अभिनयपूर्वक सांगतात-

ईक्षे शृणोमि जिघ्रामि स्वादयामि स्पृशाम्यहम् ।
इति भासयते सर्वं नृत्यशालास्थदीपवत् ।।१०

अन्वयार्थ - [अहं ईक्षे शृणोमि जिघ्रामि स्वादयामि स्पृशामि-] मी पाहतों, ऐकतों, वास घेतों, चाखतों व स्पर्श करितों [इति नृत्यशालास्थदीपवत् सर्वं भासयते-] अशा रीतीनें नृत्यशालेंतील दीपाप्रमाणें तो सर्व प्रकाशित करितो.

प्रकाश:-'मी पाहतों, इत्यादि वाक्यांत पाहणारा, विषय व साधन या तिघांची प्रतीति होते. व ती एकाच कालीं होत असते, असें स्पष्ट भासत असल्यामुळें आत्म्यास त्यांतील प्रत्येकास प्रकाशित करण्याकरितां भिन्न भिन्न कालीं भिन्न भिन्न प्रयत्न करावा लागतो - असें म्हणतां येत नाहीं. आतां तो एकाच कालीं सर्वांस कसा प्रकाशित करूं शकतो ? ही एक शंका आहे. पण तिचें उदाहरणानें समाधान करितां येतें; व त्याकरितांच ग्रंथकारांनीं नृत्यशाळेंतील दीपाचा दृष्टान्त दिला आहे. या दृष्टान्ताचें पुढच्याच श्लोकांत स्पष्टीकरण व्हावयाचें असल्यामुळें मी येथें विस्तार करीत नाहीं. ।।१०।।

-या दृष्टान्तालाच स्पष्ट करितात -

नृत्यशालास्थितो दीप: प्रभुं सभ्यांश्च नर्तकीम् ।
दीपयेदविशेषेण तदभावेऽपि दीप्यते ।।११

अन्वयार्थ - [नृत्यशालास्थित: दीप: प्रभुं सभ्यान् च नर्तकीं अविशेषेण दीपयेत्-] नृत्यशालेंतील दीप नाट्याचा अध्यक्ष, सभासद व नाचणारी स्त्री यांस अविशेषानें (सारखाच) प्रकाशित करितो. [तथा तदभावे अपि दीप्यते-] तसेंच त्यांतील कोणी नसलें तरीहि तो स्वत: प्रकाशित होतो.

प्रकाश:- प्रकाश पाडणें हें दिव्याचें काम आहे. व तें तो कोणत्याहि समयीं सारखेंच करूं शकतो. व तें करीत असतांना त्यास भिन्न भिन्न प्रयासहि पडत नाहींत. समजा कीं एका मोठ्या थोरल्या नाटकगृहांत एक विद्युद्दीप लावून ठेविला आहे. व तेथें नाटक चाललें आहे. आपल्या प्रकाशाच्या हद्दींत जें जें येईल त्या त्यास प्रकाशित करणें एवढेंच त्याचें काम असल्यामुळें, तो नाटकांतील पात्रें, सभासद, सूत्रधार इत्यादि सर्वांस एकाचकालीं प्रकाशित करील; हें उघडच आहे. तसेंच नाटक संपून सर्व आपापल्या घरीं जरी गेले तरी तो दीप स्वत: प्रकाशित होणारच. कारण नाटकगृहांत कोणी असलें तरी काय व नसलें तरी काय त्याला सारखेंच ! ।।११।।

- या दृष्टान्ताची दार्ष्टान्तिकाचे ठिकाणीं योजना करितात -

अहंकारं धियं साक्षी विषयानपि भासयेत् ।
अहंकाराद्यभावेऽपि स्वयं भात्येव पूर्ववत् ।।१२

अन्वयार्थ - [साक्षी अहंकारं धियं विषयान् अपि भासयेत्-] साक्षी आत्मा अहंकार, बुद्धि व विषय या सर्वांनाहि प्रकाशित करितो, [तथा अहंकाराद्यभावे अपि पूर्ववत् स्वयं भाति एव-] व तसेंच, अहंकारादि नसतांनाहि तो पूर्वीप्रमाणें आपणच प्रकाशित होतो.

प्रकाश:- सारांश, आपणापुढें आलेल्या पदार्थांस किंवा त्यांच्या अभावास प्रकाशित करणें हा प्रकाशरूप वस्तूंचा स्वभावच आहे. त्यामुळें आपल्यापुढें कितीहि जरी वस्तु आल्या तरी त्यांस एकसारखेंच प्रकाशित करण्यास त्यांस मुळींच श्रम पडत नाहींत. किंवा त्यांतील एकाद्यासच प्रकाशित करावें, बाकीच्यांस करूं नये, हा व्यावहारिक क्षुद्र भेदहि ते करीत नाहींत. अथवा आपल्यापुढें कांहीं नसलें तर 'कांहींएक नाहीं' असें दाखविण्याचीहि त्यांस लाज वाटत नाहीं. साक्षी आत्मा स्वयंप्रकाश कसा ? हें पूर्वी अनेकवेळां होऊन गेलें आहेच. सारांश; साक्षी जीव, बुद्धिवृत्ति, विषय व सर्वांचा अभाव यांस एकाचकालीं प्रकाशित करूं शकतो. ।।१२।।

-'अहोपण, प्रकाशरूप बुद्धिच अहंकारादि सर्व वस्तूंना प्रकाशित करण्यास समर्थ असतांना तिच्याहून भिन्न साक्षीची कल्पना करण्याची काय आवश्यकता आहे ?' उत्तर --

निरंतरं भासमाने कूटस्थे ज्ञप्तिरूपत: ।
तद्भासा भास्यमानेयं बुद्धिर्नृत्यत्यनेकधा ।।१३

अन्वयार्थ - [कूटस्थे ज्ञप्तिरूपत: निरंतरं भासमाने सति-] कूटस्थ आत्मा ज्ञप्तिरूपत्वानें निरंतर भासमान होत असतां [तद्भासा भास्यमाना इयं बुद्धि: अनेकधा नृत्यति-] त्याच्या प्रकाशाच्या योगानें प्रकाशित होणारी ही बुद्धि अनेक प्रकारें नाचते.

प्रकाश:- केवळ ज्ञान हेंच कूटस्थाचें स्वरूप आहे. त्यामुळें तो एकसारखा प्रकाशमान होत असतो. त्याला सूर्यादि तेजोमय पदार्थांचा एकदेशी दृष्टान्त पुष्कळ ठिकाणीं दिलेला आढळतो. असो; त्याच्या प्रकाशामुळेंच प्रकाशित होणारी बुद्धि नानाप्रकारचे खेळ करिते. म्हणजे विषयादिकांस प्रकाशित करण्याची शक्ति बुद्धीची नसून ती आत्म्याचीच होय. पण ती आत्म्याच्या अगदीं जवळ असल्यामुळें व अति स्वच्छ असल्यामुळें त्याचा तो गुण तेव्हांच उचलते; व मीच प्रकाशमय आहें असें बिचाऱ्या दुधखुळ्या अज्ञानी लोकांस सांगते (दाखविते). व अनेक सोंगें घेऊन एकसारखी क्रीडा करीत राहते. काम, क्रोध, सुख, दु:ख, ज्ञान, अज्ञान इत्यादि सर्व हिचे निरनिराळे वेश (पार्ट) च होत. आतां भगवद्गीतेचें वाक्य प्रमाण घेऊन वाद्यानें जी शंका केली होती तिचें निरंतर या शब्दानेंच समाधान केलें आहे. म्हणजे बुद्धि सर्वदाच सत्त्वगुणप्रधान असते असा कांहीं नेम नाहीं. तर ती रज आणि तम यांच्या द्वारा क्षणोक्षणी बदलतहि असते, तेव्हां ती विषयांदिकांस निरंतर कशी प्रकाशित करूं शकेल ? अर्थात् सतत प्रकाशरूप साक्षी आत्म्याची कल्पना अवश्य करावयास पाहिजे. याविषयीं शारीरकाच्या पांचव्या अधिकरणांत श्रीमच्छंकराचार्यांनी पुष्कळ विवेचन केलें आहे. पण विस्तारभयास्तव येथें त्यांचा अधिक उल्लेख करीत नाहीं. ।।१३।।

-हाच सिद्धान्त श्रोत्यांच्या बुद्धीवर सहज आरूढ व्हावा, म्हणून त्याचें नाटकत्वानें निरूपण करितात -

अहंकार: प्रभु: सभ्या विषया नर्तकी मति: ।
तालादिधारीण्यक्षाणि दीप: साक्ष्यवभासक: ।।१४

अन्वयार्थ - [अहंकार: प्रभु:-] अहंकार हा अध्यक्ष [विषया: सभ्या:-] विषय सभासद [मति:

नर्तकी-] बुद्धि नाचणारी स्त्री [अक्षाणि तालादिधारीणि-] इंद्रियें ताल धरणारीं मागचीं माणसें [च साक्षी अवभासक: दीप:] व साक्षी प्रकाशक दीप होय.

प्रकाश:- अध्यक्षावर सर्व जबाबदारी असते व लाभ आणि हानि हीं त्याचींच होतात. जीवाच्या ठिकाणीं प्रस्तुत सादृश्य असल्यामुळें त्यास अध्यक्ष असें म्हटलें आहे. नाच, तमाशा, इत्यादि प्रेक्षणीयं प्रकार पाहणारांवर अवलंबून असतात. पण त्यांनीं नाचणारांस कांहीं द्रव्यादिकांची लालुच दाखविल्यावांचून नाच होत नाहीं. विषय हे अध्यक्ष जो जीव त्यांस भोगाची लालुच दाखवितात व त्यामुळें तो आपल्या अंकित असलेल्या किंवा आपल्या म्हणण्याप्रमाणें वागणाऱ्या बुद्धीस वृत्तिरूपानें नाचावयास लावितो. नाचास रंग आणणारीं वाद्यें वाजविणारीं व सूर देणारीं माणसें लागतात व तींहि नाचणाऱ्या स्त्रीच्या मागोमाग जात असतात. म्हणजे नाचामध्यें कांहीं वैगुण्य येईल, असें तीं कधींच करीत नाहींत. त्याप्रमाणें इंद्रियें बुद्धीच्या मागोमाग तिच्या वृत्तिरूप नाचास साह्य करीत असतात. व ह्या सर्वांस एकाच कालीं भासविणारा जसा रंगशाळेंत दीप असतो तसाच हा सर्वावभासक साक्षी होय. सारांश, नाटकाचें रूपक या शरीरस्थितीमध्यें पूर्णपणे लागूं पडतें ॥१४॥

-'अहोपण, साक्षी अहंकार, बुद्धि, इंद्रियें इत्यादिकांचा अवभासक आहे, असें म्हटल्यास त्यांतील प्रत्येकाशीं संबद्ध होणें, वियुक्त होणें इत्यादि विकार त्याला होतील,' अशी आशंका घेऊन सांगतात-

स्वस्थानसंस्थितो दीप: सर्वतो भासयेद्यथा ।
स्थिरस्थायी तथा साक्षी बहिरंत: प्रकाशयेत् ॥१५

अन्वयार्थ - [स्वस्थानसंस्थित: दीप: यथा सर्वत: भासयेत्-] आपल्या ठिकाणींच स्थिर स्थित असलेला दीप जसा आसपासच्या सर्व पदार्थांस प्रकाशित करितो, [तथा स्थिरस्थायी साक्षी बहि: अंत: प्रकाशयेत्-] त्याप्रमाणें स्थिर राहणारा साक्षी आंतील व बाहेरील विषयांस प्रकाशित करितो.

प्रकाश:- दिवा कोठें तरी ठेवितात व त्याचा चोहोंकडे प्रकाश पडून तेथील सर्व पदार्थ प्रकाशित होतात; हें सर्वांस ठाऊक आहे. पण पदार्थांस प्रकाशित केल्यामुळें दिव्यास कांहीं विकार होत असल्याचें दिसत नाहीं. तसाच आत्माहि देहांतील व देहाच्या बाहेरील विषयांस प्रकाशित करीत असतांना स्वत: विकारी होत नाहीं. पदार्थ प्रकाशित होणें हें त्याच्या प्रकाशाचें केवळ माहात्म्यच आहे. ॥१५॥

-अहोपण, 'साक्षी आंतील व बाहेरील पदार्थांना प्रकाशित करितो', हें म्हणणें अयोग्य आहे. कारण 'अपूर्वं अनपरं अनन्तरं अबाह्यं' या श्रुतीनें त्याच्या बाह्यान्तरभावाचा अभाव सांगितला आहे, अशी आशंका घेऊन सांगतात -

बहिरंतर्विभागोऽयं देहापेक्षो न साक्षिणि ।
विषया बाह्यदेशस्था देहस्यांतरहंकृति: ॥१६

अन्वयार्थ - [अयं बहिरन्तर्विभाग: देहापेक्ष: साक्षिणि न वर्तते-] हा बहिरन्तर्विभाग देहाच्या अपेक्षेनें आहे. तो साक्षीमध्यें राहत नाहीं. [विषया: देहस्य बाह्यदेशस्था: अहंकृति: अंत:स्था-] विषय देहाच्या बाह्य प्रदेशीं राहणारे व अहंकार आंत राहणारा आहे.

प्रकाश:- शब्दस्पर्शादि विषय देहाच्या बाहेर असतात हें उघड आहे. व अहंकार अंत:करणावर राहत असल्यामुळें तो देहांत असतो हेंहि असत्य नव्हे. अर्थात् बहिर्विषय व अंतर्विषय असा जो हा भेद झालेला आहे तो देहामुळें होय, साक्षीमुळें नव्हे. ॥१६॥

-'अहोपण, वर १५ व्या श्लोकाच्या उत्तरार्धात म्हटल्याप्रमाणें साक्षी निर्विकार असतांना बाह्य व आन्तर विषयांस प्रकाशित करितो, हें म्हणणें अयोग्य आहे. कारण 'मी घटाला पाहतों' या वाक्यांतील 'मी' या रूपानें प्रथम आंत अहंकारसाक्षित्वानें भासणाराच 'घटाला पाहतों' अशा घटाकारवृत्ति स्फुरणरूपानें बाहेर निघत असल्याचा अनुभव येतो !' अशी शंका घेऊन म्हणतात --

अंत:स्था धी: सहैवाक्षैर्बहिर्याति पुन: पुन: ।
भास्यबुद्धिस्थचांचल्यं साक्षिण्यारोप्यते वृथा ॥१७

अन्वयार्थ - [अंत:स्था धी: अक्षै: सह एव पुन: पुन: बहि: याति] आंत असणारी बुद्धि इंद्रियांसह वारंवार बाहेर जाते. [तथा च भास्यबुद्धिस्थचांचल्यं साक्षिणि वृथा एव आरोप्यते-] त्यामुळें प्रकाशित होणाऱ्या बुद्धींतील चंचलता साक्षीच्या ठिकाणीं उगीच आरोपित केली जाते.

प्रकाश:- बुद्धि देहांत असते हें आबालवृद्धांस ठाऊक आहे. ती साक्षीकडून सर्वदा प्रकाशित होत असते. म्हणजे चंद्रांतील तेज जसें खुद्द त्याचें नसून तें सूर्यापासून मिळालेलें असतें त्याप्रमाणें बुद्धिमध्यें दिसणारें चैतन्य खुद्द बुद्धीचें नसून तें आत्म्यापासून तिला मिळालेलें असते. व त्या उसन्या चैतन्याच्या जोरावर ती क्षणोक्षणीं इंद्रियाच्या द्वारा बाहेर पडून पदार्थास व्यापिते. अर्थात् चंचलता हा बुद्धीचा धर्म होय. आत्म्याचा नव्हे. पण, जे तुझ्यासारखे अविवेकी असतात त्यांना हा सूक्ष्म विचार कोणी सांगितल्यावांचून समजत नाहीं. व त्यामुळें ते बुद्धीचा विकार आत्म्याच्या माथीं मारितात. ॥१७॥

-'भास्याच्या चांचल्याचा आरोप भासकावर होतो, असा अनुभव कोठें येतो ?' अशी शंका घेऊन पुढील दोन श्लोकांत दृष्टान्त व दार्ष्टान्तिक यांच्या द्वारा तसा अनुभव येत असल्याचें दाखवितात -

गृहांतरगत: स्वल्पो गवाक्षादातपोऽचल: ।
तत्र हस्ते नर्त्यमाने नृत्यतीवातपो यथा ॥१८
निजस्थानस्थित: साक्षी बहिरंतर्गमागमौ ।
अकुर्वन् बुद्धिचांचल्यात्करोतीव तथा तथा ॥१९

अन्वयार्थ - [गवाक्षात् गृहांतरगत: स्वल्प: आतप: अचल: एव वर्तते-] **झरोक्यांतून गृहांत पडलेला लहानसा कवडसा स्थिरच असतो. [किंतु तत्र हस्ते नर्त्यमाने सति यथा आतप: नृत्यति इव-] पण त्यांतून जर कोणी आपला हात इकडून तिकडे नाचवूं लागलें तर तो कवडसाच नाचत आहे, असा ज्याप्रमाणें भास होतो; [तथा निजस्थानस्थित: साक्षी बहिरंत गमागमौ अकुर्वन् एव सन्-] त्याप्रमाणें आपल्या स्थानींच बसलेला साक्षी आंत बाहेर जात येत नसतांनाच [बुद्धिचांचल्यात् तथा तथा करोति इव-] बुद्धीच्या चंचलतेमुळें आंत बाहेर जात येत आहे; असें वाटतें.**

प्रकाश:- झरोक्यांतून घरांत पडणाऱ्या कवडशाशीं लहान लहान मुलें खेळत असतात. व तो एके ठिकाणींच असतांना हातांच्या नाचविण्यामुळें तोच नाचत आहे कीं काय असा भास होतो. तसाच या आत्म्याच्या विकाराचाहि प्रकार आहे. म्हणजे बुद्धीच्या चंचलतेमुळें त्या बिचाऱ्या निर्लेप आत्म्यावर विकारित्वाचा उगीच आरोप होतो. दुष्ट वस्तूंच्या संगतीचा असाच परिणाम व्हावयाचा. निजस्थानस्थित: कूटस्थ साक्षीचें मुख्य स्थान ब्रह्मत्व (जगदधिष्ठानत्व) आहे. त्यांत असलेला म्हणजे आपल्या मुख्य स्वरूपापासून च्युत न झालेला; विकार न पावलेला; असा याचा अर्थ समजावा. ॥१८॥१९॥

-'निजस्थानस्थित:' या शब्दानें साक्षीचें बाह्य देशांत स्थित होणेंच का सांगितलें आहे ? उत्तर - नाहीं -

न बाह्यो नांतर: साक्षी बुद्धेर्देशौ हि तावुभौ ।
बुद्ध्याद्यशेषसंशांतौ यत्र भात्यस्ति तत्र स: ॥२०

अन्वयार्थ - [साक्षी न बाह्य: न च आंतर:-] साक्षी बाह्य नाहीं व आंतरहि नाहीं. [हि तौ उभौ बुद्धे: देशौ स्त:-] कारण ते दोन्ही बुद्धीदे देश आहेत. [अत: बुद्ध्याद्यशेषसंशांतौ यत्र भाति तत्र स: अस्ति-] यास्तव बुद्ध्यादि सर्वांची पूर्णपणें शांति झाली असतां जेथें साक्षी भासतो, तेथेंच तो सदा असतो.

प्रकाश:- साक्षी सदा स्वस्थानींच असतो म्हणजे काय ? देहाच्या बाहेरी प्रदेश हें त्याचें स्थान नव्हे, व आंतील प्रदेश हेंहि नव्हे. तर बुद्धि, इंद्रियें, प्राण, इत्यादि सर्व सूक्ष्म कार्यांचा प्रयत्नानें लय केला असतां तो जेथें दिसतो तेंच त्याचें खरें स्थान आहे. व्यवहार कालींहि तो तेथेंच असतो. बुद्धि इत्यादि साधनांनीं इकडे काय पाहिजे तें जरी केलें तरी. तो आपलें स्थान सोडीत नाहीं. तेथूनच आपली शक्ति त्यास उसनी देत असतो. सारांश तो सर्वकालीं निर्विकारच आहे. व त्याला साक्षी ही जी संज्ञा येत असते ती तरी बुद्ध्यादि जड पदार्थांच्या अपेक्षेनेंच होय असें समजावें. ॥२०॥

-'अहोपण, बुद्ध्यादि सर्वांचा व्यवहार शांत झाल्यानंतर मुळीं प्रदेशच उपलब्ध होत नाहीं मग 'जेथें तो भासतो, तेथें असतो, असें कसें म्हणतां ?' अशी शंका घेऊन तिचें समाधान -

देश: कोऽपि न भासेत यदि तर्ह्यस्त्वदेशभाक्
सर्वदेशप्रक्लृप्त्यैव सर्वगत्वं न तु स्वत: ॥२१

अन्वयार्थ - [यदि क: अपि देश: न भासेत तर्हि अदेशभाक् अस्तु-] जर कोणताहि देश भासत नाहीं असें म्हणशील तर साक्षी देशरहितच असो. [सर्वदेशप्रक्लृप्त्या एव सर्वगत्वं स्वत: तु न-] सर्व देशाच्या कल्पनेमुळेंच त्याला सर्वगत्व आहे; स्वभावत: नव्हे.

प्रकाश:- सर्वांचा प्रलय झाल्यावर साक्षीस राहण्यास मुळीं जागाच उरत नाहीं असें जर म्हटलें तर तें आम्हांस इष्ट आहे. कारण देशादि व्यावहारिक पदार्थांच्या अधिष्ठानास देशादिकांची मुळीं. गरजच नसते. म्हणजे देशादि कल्पना बाह्य व अर्वाचीन आहेत.

वादी:- तर मग त्या परमात्म्यास तुम्ही सर्वगत कसें म्हणतां ?

सिद्धान्ती:- देशादि सर्व पदार्थांची त्याच्याठायींच कल्पना झालेली असल्यामुळें तो सर्वांचे अधिष्ठान आहे. व अधिष्ठान आरोपित पदार्थांस व्यापून टाकीत असतें असा न्याय व अनुभव आहे, आणि त्यामुळें त्यास सर्वगत, सर्वशक्ति, सर्वांतर्यामी इत्यादि सर्व नामें प्राप्त झालीं आहेत. पण तीं त्याच्या स्वभावभूत नव्हेत. ॥२१॥

-सर्वगतत्त्वाप्रमाणें त्याचें सर्वसाक्षित्वहि वास्तविक नव्हे, असें सांगतात -

अंतर्बहिर्वा सर्वं वा यं देशं परिकल्पयेत् ।
बुद्धिस्तद्देशग: साक्षी तथा वस्तुषु योजयेत् ॥२२

अन्वयार्थ - [बुद्धि: अंत: वा बहि: वा सर्वं वा यं देशं परिकल्पयेत्-] बुद्धि, आंतील देश, बाहेरील देश, सर्व देश इत्यादि ज्या देशाची कल्पना करील [तद्देशग: साक्षी वस्तुषु तथा योजयेत्-] त्या देशामध्यें असणारा साक्षी वस्तूंच्या ठिकाणीं तशी योजना करितो.

प्रकाश:- देशादि सर्व पदार्थांची कल्पना अनादि अज्ञानामुळें बुद्धि करिते. सर्व कल्पनांचें अधिष्ठान कूटस्थ आत्माच आहे. अर्थात् बुद्धि जी जी कल्पना करिते तिच्या तिच्या मुळाशीं हा असतोच आणि त्यामुळें तो सर्व कल्पनांचा साक्षी होऊन 'हा अहंकार, हें बाहेरील घटादि पदार्थ' इत्यादि भासवितो. तात्पर्य सर्वसाक्षित्व हाहि एक आरोप आहे. ॥२२॥

-'तथा वस्तुषु योजयेत्' याचेंच अधिक स्पष्टीकरण-

यद्यद्रूपादि कल्प्येत बुद्ध्या तत्तत्प्रकाशयन् ।

तस्य तस्य भवेत्साक्षी स्वतो वाग्बुद्ध्यगोचर: ॥२३

अन्वयार्थ - [बुद्ध्या यत् यत्, रूपादि कल्प्येत] बुद्धीकडून ज्या ज्या रूपादि विषयांची कल्पना केली जाते, [तत् तत् प्रकाशयन् स्वत: वाग्बुद्ध्यगोचर: तस्य तस्य साक्षी भवेत्]त्या त्या विषयास प्रकाशित करणारा स्वत: वाणी व बुद्धि यांचा विषय नसतांनाहि त्याचा त्याचा साक्षी होतो.

प्रकाश:- बुद्धि विषयांची कल्पना करिते व आत्मा त्या सर्वांस प्रकाशित करितो. आणि त्यामुळेंच तो त्यांचा साक्षी होतो. पण वस्तुत: तो वाणी व मन यांना विषय होणार नाहीं. म्हणजे अशा आत्म्यास साक्षी म्हणणें हें सुद्धां गौणच होय. पण काय करणार ? त्यावांचून व्यवहार होऊंच शकत नाहीं. ॥२३॥

आतां - आत्मा जरी वस्तुत: कोणत्याहि साधनाचा विषय होत नसला तरी मुमुक्षूस त्याचें कसें ज्ञान होऊं शकतें ? तें प्रश्नपूर्वक सांगतात -

कथं तादृङ्मया ग्राह्य इति चेन्मैव गृह्यताम् ।
सर्वग्रहोपसंशांतौ स्वयमेवावशिष्यते ॥२४

अन्वयार्थ - [तादृक मया कथं ग्राह्य: इति चेत्] तशा प्रकारच्या आत्म्याचें मला कसें ग्रहण करतां येईल ? [मा गृह्यतां एव] असें जर विचारशील तर [सर्वग्रहोपसंशांतौ स: स्वयं एव अवशिष्यते] तूं मुळीं ग्रहण करूंच नकोस; असें आम्हीं सांगतों ! ग्रहण करितां येणाऱ्या सर्व वस्तूंची उत्तम प्रकारें शांति झाली असतां तो आपोआप अवशिष्ट राहातो.

प्रकाश:- ''वाणी व मन हीं दोन्ही ज्ञानाचीं फार उत्तम साधनें आहेत. पण त्यांच्या योगानें तर आत्म्याचें ज्ञान होत नाहीं; असें म्हणतां ! तेव्हां त्याचें ज्ञान व्हावें तरी कसें ? तात्पर्य, आत्मज्ञान अशक्य आहे असें मी समजतों.'' असें जर तूं म्हणशील तर तें आम्हांस इष्टच आहे. कारण त्याचे जर बुद्धिद्वारा ज्ञान होऊं लागलें, तर घटादि जड पदार्थ व आत्मा यांच्यामध्यें मुळींच अंतर राहणार नाहीं. म्हणजे तो जड आहे; असें म्हणावें लागेल. यास्तव त्याचें ज्ञान साधनाच्या योगानें होत नाहीं हेंच म्हणणें आम्हांस पूर्ण मान्य आहे. तर मग मुमुक्षु कृतार्थ कसे होतील ? म्हणून जर विचारशील तर सांगतों-आत्मा व अनात्मवर्ग यांचा दीर्घकाल (बाध) विचार करून त्यांच्या विषयीं पूर्ण विवेक झाला म्हणजे सर्व अनात्मवर्गाचा लय होतो व तदनंतर आत्मा स्वत:च अवशिष्ट राहतो. आणि तो स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याचें ग्रहण कसें करितां येईल ही शंकाच येत नाहीं. ॥२४॥

-कारण -

न तत्र मानापेक्षाऽस्ति स्वप्रकाशस्वरूपत: ।
तादृग्व्युत्पत्त्यपेक्षा चेच्छ्रुतिं पठ गुरोर्मुखात् ॥२५

अन्वयार्थ - [स्वप्रकाशस्वरूपत: तत्र मानापेक्षा न अस्ति] आत्मा स्वप्रकाशस्वरूप असल्यामुळेंच त्यास इंद्रियसंज्ञक प्रमाणाची अपेक्षा नसते [तादृक व्युत्पत्त्यपेक्षा चेत् गुरो: मुखात् श्रुतिं पठ] आतां, अशा प्रकारच्या ज्ञानाचीच जर अपेक्षा असेल तर गुरुमुखानें श्रुतीचें पठण कर.

प्रकाश:- जड पदार्थांच्या ज्ञानास इंद्रियांची अपेक्षा असते व स्वप्रकाश पदार्थांस त्यांची अपेक्षा नसते. पण आत्मा स्वयंज्योति आहे, हें अगोदर समजलें पाहिजे. व त्याकरितां गुरुमुखानें वेदान्ताध्ययन करणें अति अवश्य आहे. ॥२५॥

'हा सर्व उत्तमाधिकाऱ्याकरितां उपदेश आहे. माझ्यासारख्या मंदाकरितां नव्हे,' म्हणून जर म्हणशील तर तुझ्याकरितांहि उपाय सांगतों, ऐक:--

यदि सर्वग्रहत्यागोऽशक्यस्तर्हि धियं व्रज ।
शरणं तदधीनोऽतर्बहिर्वैषोऽनुभूयताम् ॥२६

अन्वयार्थ - [यदि सर्वग्रहत्याग: अशक्य: तर्हि

धियं शरणं व्रज] सर्व प्रत्ययरूप ग्रहाचा त्याग करणें अशक्य आहे, असें जर तुला वाटत असलें; तर तूं बुद्धीस शरण जा. [तदधीन: अंत:वा बहि: एष: अनुभूयताम्]व बुद्धीच्या अधीन राहणाऱ्या ह्या साक्षीचा अंतरविषयांमध्यें किंवा बाह्य विषयामध्यें अनुभव घे.

प्रकाश:- ज्यांना चित्ताच्या ऐकाग्र्याची युक्ति ठाऊक नसते त्यांना देह व इंद्रियें जोंपर्यंत अस्तित्वांत आहेत तोपर्यंत विषयजन्य ज्ञान झाल्यावांचून राहणार नाहीं असें वाटतें, म्हणून त्यांच्याकरितां येथें दुसरा उपाय सांगितला आहे. सर्व ज्ञानाचा बाध होणें शक्य नाहीं असें वाटत असल्यास बुद्धीचाच आश्रय करणें हा अगदीं सोपा उपाय आहे. आतां बुद्धीचाच आश्रय केल्यास कोणता लाभ होणार, म्हणून जर विचारशील तर सांगतों. बुद्धि ज्या ज्या बाह्य किंवा आंतर विषयाची कल्पना करिते तिचा साक्षी जो परमात्मा त्याचा सर्वदा अनुभव घ्यावा. थोडक्या विचारानें या साक्षीची ओळख होणें शक्य असल्यामुळें हा अगदीं सोपा उपाय आहे; असें म्हटलें आहे. मुक्तिरूप फलाविषयींचा मतभेद नाहींसा करणें हा या प्रकरणाचा मुख्य उद्देश आहे; व सहा तात्पर्य लिंगांवरूनहि हीच गोष्ट निश्चित होत आहे. ॥२६॥

इति दशदश्यां नाटकदीप: ॥१०॥